ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 7 | ISSUE - 2 | OCT - 2020

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# प्रसार माध्यमाचा इतिहास एक अभ्यास



डॉ. लदाफ शफ़ी खजामैनोद्दीन
इतिहास विभाग ,
आज़ाद महाविद्यालय औसा जि. लातूर (महाराष्ट्र) .

## प्रस्तावना:-

'प्रसारमाध्यम' या शब्दाचे दोन विभाग पडतात जसे 'प्रसार' याचा अर्थ आपले मत दूरपर्यंत दुसऱ्याला पोचविणे तर दुसरा अर्थ असा होतो की एखादी बातमी किंवा समाचार लोकांपर्यंत पोहोचवण्याची असेल तर दुसऱ्या कडून तिसऱ्या कडे दवंडी लावून त्या बातमीचा प्रसार व प्रचार करीत असे. भारतीय समाजामध्ये व्यापक प्रमाणात आधुनिकीकरणाची प्रक्रिया १९ व्या शतकाच्या प्रारंभी ब्रिटिशांच्या प्रभाखालि सुरू झाली. यासंदर्भात भाषिक वृत्तपत्रांनी आणि प्रारंभीच्या समाजसुधारकांनी बजावलेले कार्य अत्यंत महत्त्वाचे ठरते. प्रारंभीच्या भारतीय वृत्तपत्राचे अर्थात प्रसार माध्यमाचे महत्त्व व कार्य समजावून घेणार नाहित तो पर्यंत प्रसारमाध्यमांचा अर्थ समजू शकणार नाही. भारतीय समाजात रूढी परंपरा, अंधश्रद्धा आणि अज्ञान भरलेल्या या समाजाला प्रगतीचा नवा मार्ग दाखवण्याचे काम या वृत्तपत्रांच्या प्रसारमाध्यमांतून झाल्याचे दिसून येते. महाराष्ट्रातील प्रारंभीच्या काळात अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत ही विधायक कार्याचा आदर्श डोळ्यासमोर ठेवला आहे. लोकमान्य टिळकांचा 'केसरी', 'मराठा', बाळशास्त्री जांभेकर यांच्या 'दर्पण' या वृत्तपत्रांच्या प्रसार माध्यमातून केवळ राजकीय दृष्टीने नव्हे तर सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक तसेच सांस्कृतिक दृष्टीने बजावलेली कामगिरी लक्षणीय ठरली आहे. कारण वसाहतवादी समाजामध्ये सांस्कृतिक राजकीय उठाव घडून आणणे हे अत्यंत कठीण व आव्हानात्मक कार्य आहे. हे सर्व मराठी वृत्तपत्रांच्या प्रसार माध्यमातून पार पडले.[१]

बंगाल प्रांतात ब्रिटिशांनी इंग्रजी शाळा सुरू करून शैक्षणिक क्षेत्रात परिवर्तन प्रारंभ केला. या इंग्रजी शाळेतून भारतातील एक मध्यमवर्गीय बुद्धिजीवी वर्ग निर्माण झाला त्यामुळे भारतातील सुधारणावादी कार्यास खऱ्या अर्थाने सुरुवात झाली. महाराष्ट्रातील बाळशास्त्री जांभेकर, भाऊ दाजी लाड, महाजनहरी गोपाळ, हरी देशमुख, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, विष्णुशास्त्री चिपळूणकर,

**न्यायमूर्ती महादेव रानडे, लोकमान्य टिळक इत्यादी मध्यमवर्गीय इंग्रजी शिक्षण घेतलेले महाराष्ट्रात निर्माण** के**ली हि नवी पिढी** प्रसार माध्यमातून लिहू लागली. ही सर्व नवीन पिढी शिक्षित असल्यामुळे इंग्रजीचा ज्ञान असल्यामुळे त्यांच्यावर पाश्चिमात्य समाज, अर्थव्यवस्था, राजकारण, संस्कृती इत्यादीच्या त्यांनी अभ्यास केला. त्याचप्रमाणे युरोपातील स्वातंत्र्यलढा, लोकशाही, उदारमतवादी स्वातंत्र्य या संकल्पनांचा महाराष्ट्राला परिचय झाला. रुसो, मिल, स्पेन्सर, अगस्त कॉत, जॉर्ज वॉशिंग्टन, जेफर्सन मोरले, **बर्ग, थॉमस पेन इत्यादी राजकीय, सामाजिक, आर्थिक, विचारांचा प्रभाव समाजावर झाला. त्यामुळे पाश्चिमात्य संस्कृती, धर्म, समाज व्यवस्था इत्यादी तुल**ना **भारतीय संदर्भात केली जाऊ लागली. त्यातून आपण परिवर्तन किंवा बदल**ने आवश्यक आहे **याचा अर्थबोध त्यांना झाला. त्या**नी **महाराष्ट्रात अथवा संपूर्ण भारतात प्रसार प्रसारमाध्यमांच्या माध्यमातून सामाजिक सुधारणा चळवळ उभी करण्याची बहुमोल कामगिरी केली. या सर्व काळात महाराष्ट्रातली प्रसार माध्यमात अर्थात वृत्तपत्रात वैचारिक वारे**ची **लढाई सुरू झाली.**[२]

इंग्रजांच्या **काळात हिंदू धर्मातील विचार पद्धतीला प्रचंड आव्हाने मिळू लागली होती. यापूर्वी दोन हजार वर्षात प्राचीन धर्म व्यवस्थेला व धर्म ग्रंथांना अशी आव्हाने कधीच मिळाली नाही. या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी मराठी वृत्तपत्रांनी लोकांच्या मानसिकतेची जडणघडण केली. त्याच्यामुळे त्यांच्यातले व्यक्तिमत्व, राष्ट्रप्रेम,** स्वधर्म प्रेम जागृत केले. 'दर्पण प्रभाकर इंदुप्रकाश', 'पुणे वैभव', 'वर्त वैभव' इत्यादी प्रसार माध्यमाच्या आवर्तति पत्राद्वारे बुद्धिजीवी विचारवंत आणि वैचारिक लेख लिहून जनतेमध्ये नव्या जाणिवांचा विकास घडवून आणला. माध्यमानी चालवलेल्या हिंदू धर्मातील वृद्ध लोकांना सामूहिक पद्धतीने एकत्र येऊन निर्माण झालेल्या धार्मिक समस्या विषयी विचार करण्यास प्रवृत्त केले. त्याच प्रमाणे इंग्रजांच्या राज्यकारभारात किंवा प्रशासकीय सेवेत स्थानिक जनतेतील सुरक्षित बुद्धिजीवी वर्गाला हेतुपुरस्पर लावलेले होते. त्यामुळे जनतेत रोष निर्माण झाला होता.[३]

**13 एप्रिल 1832 च्या अंकात** बाळशास्त्री जांभेकर यांनी या देशाचे लोकातून मोठ्या सरकारी जागांवर 'नेमणुका' हा लेख प्रसिद्ध करून सरकारचे लक्ष वेधून घेतले होते. या लेखात म्हटले होते की 'राज्यकारभारातील कित्येक खात्यात विश्वासाचे आणि अब्रूचे जोखीम आहे. या जागांवर देशाचे लोक योग्य आहेत किंवा नाही या गोष्टीचा विचार येथील सरकारने आणि कोर्ट ऑफ डायरेक्टर यांनी अनेक वेळा केला आहे. तथापि अजून या देशातील लोकातून कोणाची नेमणूक मोठ्या जागेवर झाली नाही.' बाळशास्त्री जांभेकर यांच्या लेखनाद्वारे भाषा वापरून सरकारचे कानउघाडणी करतात देशात लोक बुद्धिजीवी आहेत, कार्यकुशल **आणि विश्वासू आहेत ते निवडणूक दिलेले काम करतात अशा अर्थाचे विचार जांभेकरांनी 'दर्पण' या वृत्तपत्राच्या माध्यमातून सरकारपर्यंत** पोचवून देशी लोकांच्या नेमणुका विषय आणि थोडा विचार करून तसे झाले नाही याची खंत जांबेकर प्रसार माध्यमाद्वारे सरकारकडे व्यक्त करतात.[४]

**शिक्षण तज्ञ निकाले गव्हर्नर जनरल एलफिस्टन यासारखे अनेक इंग्रज अधिकारी उदारमतवादी विचाराचे होते. त्यांना मनापासून वाटत होते की भारतीय समाज** विकास व्हा**वा या विचारांच्या** जव्हीस नावाचा एक इंग्रज अधिकारी होता. त्याच्याविषयी गोविंद तळवळकर म्हणतात की **"1**823 ते **1839** च्या दरम्यान प्रथम मुंबई नंतर पुणे येथे मराठी-इंग्रजी शाळांची स्थापना **केली. देशी भाषेतून शिक्षण घ्यावे असे त्याला वाटत होते. यावरून काही उदारमतवादी इंग्रज अधिकारी आणि बुद्धिवादी विचारवंत तसेच तत्कालीन वृत्तपत्राचे संपादक यांनी महाराष्ट्रात पाश्चिमात्य धर्तीवर शिक्षण पद्धती समाजात रुजवून त्याच्यापासून होणारे लाभ काय आहेत याची विवेचन समाजासमोर मांडले. या शिक्षण पद्धतीचे कार्य बाल्यावस्थेत होते अशा परिस्थितीत सनातनी वर्गाने इंग्रजी शिक्षणाला सतत विरोध केला. त्याचे पडसाद प्रसार माध्यमातून दिसून येतात. ऑक्टोबर 1854 च्या पुणे येथील 'ज्ञान प्रकाश'** वृत्तपत्रात कवीने आपली **कविता प्रसिद्ध करून त्यांची चिंता व्यक्त केली.**[५]

१९ व्या **शतकापासून स्त्री शिक्षणाची चर्चा वृत्तपत्राच्या प्रसारमाध्यमातून सुरू झालेली होती. ही परिस्थिती स्त्री शिक्षणाच्या दृष्टीने अत्यंत प्रतिकूल स्वरूपाची होती. परंतु 'दर्पण', 'ज्ञानोदय', 'प्रभाकर', 'ज्ञानप्रकाश'** इ. **मराठी वृत्तपत्रांतून स्त्री शिक्षणाचे महत्त्व त्याचे फायदे-तोटे वारंवार लोकांसमोर स्पष्ट करण्यात येत होते. त्यामुळे समाजास तुम्ही शिक्षणाविषयी हळूहळू अनुकूल दृष्टिकोन निर्माण होऊ लागला होता त्याच बरोबर प्रतिकूल परिस्थितीत हळूहळू तीव्रता कमी होऊ लागली होती. वर्तपत्रा प्रमाणे मराठी ग्रंथा विषयी चर्चा करण्यात येत होती. बाबा पदमनजी यांनी 'यमुनापर्यटन' या कादंबरीतून विधवा स्त्रियांचे चित्रण व्यक्त केली आहे. मराठी मध्ये शिक्षणाविषयी विचार स्पष्ट करण्यात आले. गंगाधर शास्त्री** यांचा **'अर्थ अभ्यास प्रकरण' 1841 मध्ये प्रकाशित करण्यात** आला. तसेच **बाबा पदमनजी याने 1853 मध्ये** 'स्त्री **शिक्षण', 'विद्या अभ्यास' निबंध लिहिलेले हे पुस्तक अमेरिकन खात्यातर्फे प्रकाशित करण्यात आले. तसेच पाडगावकर यांनी हिंदू लोकांच्या चालीरीती सुधारणा विषयी 'बोध' हा ग्रंथ लिहून स्त्री शिक्षणाचे महत्त्व स्पष्ट केले. अशाप्रकारे** १९ **व्या शतकात या पूर्वार्धात मराठी वृत्तपत्राने अथवा प्रसार माध्यमाने इतर मराठी** वाङःमय **यांनी स्त्री शिक्षणाचे महत्त्व स्पष्ट करून त्याविषयी लोकांची मानसिकता तयार केली.**[६]

## सारांश:-

माहितीचा मुक्त प्रवाह समाजात पसरविण्यासाठी प्रसार माध्यमाची आवश्यकता असते. अग्रलेख, विविध पुरवण्या, मुद्रित साहित्य, नियतकालिके, साप्ताहिक, पाक्षिक, **मासिक**, दूवेमासिक, त्रेमासिक, वार्षिक अंक वर्तमानपत्राचे **अविभाज्य भाग असतात. वाचकांच्या** पत्रव्यवहार यांच्या **माध्यमातून** आपले **म्हणणे मांडत असतात. लोकशाही अधिक सुदृढ होण्यास वर्तमानपत्रे मदत करू शकतात. त्याचबरोबर प्रसार माध्यमाद्वारे मिळणाऱ्या माहितीचे आकलन करून घ्यावे लागते. प्रत्येक वेळी वर्तमानपत्रांमधून आपणासमोर येणारी माहिती वास्तवाला धरून असलेले तसे नाही आपणास ती तपासून घ्यावी लागते. अनाधिकृत बातमी प्रसिद्ध होण्याची एक जगप्रसिद्ध कारण असे आहे की एका**

**जर्मन साप्ताहिकाने हिटलरच्या हस्ताक्षरातील अनेक रोजनिशी विकत घेतल्या आणि त्या इतर प्रकाशक कंपन्या विकल्या त्या रोजनिशी नकली असल्याचे सिद्ध झाले. त्यामुळे प्रसार माध्यमातून मिळणारी माहिती वर्तमानपत्र मिळणारी माहिती वापरताना काळजी घ्यावी लागते. तसेच वर्तमानपत्र रोजच्या रोज ताज्या बातम्या वाचकांपर्यंत पोहोचवण्याचा असतात. हे काम करत असताना बातमी मागची बातमी सांगावी लागते. अशा वेळी वर्तमानपत्रांना इतिहासाची गरज पडते. एखाद्या बातमीचा सविस्तर आढावा घेताना भूतकाळात अशा स्वरूपाची एखादी घटना दुसरीकडे घडली असल्यास वर्तमानपत्र ती बातमीमध्ये चौकट येऊन थांबतात तेव्हा वाचकाला भरपूर माहिती मिळते आणि घटनेच्या मुळापर्यंत जाता येते.**

**तसेच वर्तमानपत्रामधील सदरांमध्ये** ५० **वर्षांपूर्वी** व १०० **वर्षांपूर्वी अशा अनेक प्रकारची असतात. ती इतिहासाची साधने आणि इतिहासावर आधारित असतात. या प्रकारच्या सदरांमधून** आपणास भूत**काळातील आर्थिक, सामाजिक, राजकीय, ऐतिहासिक घटना** समजतात. भूतकाळाच्या पार्श्वभूमीवर वर्तमान कळण्यास मदत होते. वर्तमानपत्रांना विशेष प्रसंगी पुरवण्या किंवा विशेषांक काढावे लागतात. उदा., 1914 मध्ये पहिले महायुद्ध याला 2014 मध्ये शंभर वर्ष पूर्ण झाली. त्या युद्धाच्या सर्वंकष आढावा घेणारी पुरवणी काढताना या घटनेचा इतिहास माहीत असावा लागतो. 1942 च्या 'चले जाव' आंदोलनाला 2017 मध्ये 75 वर्षे पूर्ण झाली. अशा प्रसंगी वर्तमानपत्रे लेख, अग्रलेख, दिनविशेष, आढावा त्याच्या आधारे द्वारे त्या घटनेचा वेध घेतात. त्या**वेळी इतिहासाचा अभ्यास उपयोगी पडतो.**

**प्रसारमाध्यम आकाशवाणी सुद्धा इतिहास हा महत्त्वाचा विषय** असतो. उदा. **15 ऑगस्ट 1947 किंवा त्यानंतरच्या प्रधानमंत्री स्वातंत्र्य दिनानिमित्त भाषणे आकाशवाणीच्या संग्रहात असून त्याची समकालीन परिस्थिती समजण्यासाठी उपयो**ग होतो. **आकाशवाणी** काही विशेष **कार्यक्रम प्रसंगी इतिहासाच्या अभ्यासकांची गरज** लागते. **राष्ट्रीय नेत्यांची जयंती** वा **पुण्यतिथी, एखाद्या** ऐतिहसिक **घटने**स १ **वर्ष, 25 वर्षे,** ५० **वर्षे,** १०० **वर्षे आणि त्याहीपेक्षा जास्त वर्षे पूर्ण होत असतील तर त्याची चर्चा करण्यासाठी त्या घटनेची माहिती घ्यावी लागते. राष्ट्रीय नेत्यांच्या कार्यावर भाष**णे **देण्यासाठी** वक्त्याना **इतिहासाचा आधार घ्यावा लागतो.**

**दूरदर्शन आणि इतिहास याचे जवळचे नाते आहे. इतिहासाच्या संदर्भात आवड निर्माण करण्या**चे **आणि जागृ**ती **करण्याचे महत्त्वाचे कार्य दूरदर्शन** आणि **इतर वाहिन्या करतात. दूरदर्शनवरील रामायण, महाभारत अशा पौराणिक मालिका तसेच भारत एक खोज, राजा शिवछत्रपती या ऐतिहासिक मालिकां**नी फार मोठा प्रेश्वर्ग आक्रिषत केला. **रामायण-महाभारत** सारख्या **मालिकां**ची **निर्मिती करताना तत्कालीन वातावरण, वेशभूषा, शस्त्रास्त्रे, राहणीमान, भाषा या संबंधीच्या** जानकारांच्या मदतीची गरज लागते. त्यासाठी **इतिहासाच्या बारकाईने अभ्यास करावा लागतो.**

**आधुनिक काळात Discovery, History TV** 18 यासारख्या **खाजगी वाहने किंवा चॅनलवर प्रसारित होणाऱ्या मालिकांमधून जगभराच्या इतिहासाचा खजिना प्रेक्षकांसाठी खुला केलेला आहे.**

**त्याद्वारे लोक जगाचा इतिहास जाणून घेऊन शकतात. या मालिका अधिक रंजक होण्यासाठी काही वेळा इतिहासातील निवडक भागाचे व्यक्तिरेखांच्या माध्यमातून सादरीकरण केले जाते उदाहरणात कर्तृत्ववान स्त्री-पुरुष खेळाडू सेनानी इत्यादी. वरील सर्व क्षेत्रांसाठी इतिहासाचा सखोल अभ्याससा**ची **आज गरज आहे.**

## संदर्भ ग्रंथ


शुभागणा अत्रे, गणेश राउत इतिहस व राज्यशाश्त्र इयता दहावी, प्रकाशन पाठ्यपुस्तक मंढळ, निर्मिति पुणे प्रुष्ठ क्र. ३२

गि. अच. पटेल समजिक व**वर्तपत्रे** आणि समजिक आदोलन प्रथम आव्रत्ति प्रुष्ठ क्र. ९०

कित्ता ११८, ११९

शुभागणा अत्रे, गणेश राउत इतिहस व राज्यशाश्त्र इयता दहावी, प्रकाशन पाठ्यपुस्तक मंढळ, निर्मिति पुणे प्रुष्ठ क्र. ३३

कित्ता प्रुष्ठ क्र. ३४

कित्ता प्रुष्ठ क्र. ३७